I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 28-33 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
OPEN ACCESS
Reg. No. : MH-NGP/000107
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# लाकडाऊन मध्ये निर्माण झालेल्या स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि सुक्ष्म, लघु व मध्यम (MSME) उद्योगावर झालेला त्यांचा परिणाम

गोविंदा मदन झाडे
अॅड. यादवराव धोटे महाविद्यालय, राजुरा
तह. राजुरा, जि. चंद्रपुर
govindazade@gmail.com

**ABSTRACT:**

**Key words:** - *melanogenesis, melanocytes, pigmentation*

**प्रस्तावना:-**

दि. 22 मार्च 2020 रोजी 'जनता कर्फ्यू 'पुर्ण होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत सरकारने देशभरातील कोव्हीड-19 या साथीच्या रोगावर प्रतिबंधक उपाय म्हणुन भारतातील संपुर्ण 1.3 अब्ज लोकसंख्येच्या हालचाली मर्यादित ठेवुन 21 दिवस (25 मार्च ते 14 एप्रिल) देशव्यापी लाॅकडाऊनचा आदेश दीला. आणि त्यानंतर देशातील कोविड-19 प्रभावित भागातील अनेक नियमांची अंमलबजावणी करण्यात आली. पुढे कोरोना विषाणुचा वाढता प्रभाव लक्षात घेता 15 एप्रिल 2020 - 03 मे 2020 (19 दिवस), 04 मे - 17 मे (14 दिवस), 18 मे - 31 मे (14 दिवस) आणि पुढे केवळ कंटेनमेंट झोनसाठी 1 जुन 2020 - 30 जुन 2020 रोजी समाप्त होण्याच्या लाॅकडाऊन ची घोषणा करण्यात आलेली आहे.

अशा या स्थितीत भारता समोर अनेक आर्थिक संकट उभे राहिले. संपुर्ण काम, उद्योग बंद झाल्याने समाजातील मध्यम तसेच विशेष म्हणजे निम्म उत्पन्न गटातील लोकांचे विशेष हाल झाले, खाण्या-पिण्याच्या अनेक समस्या उद्भवु लागल्या. विशेषतः पर राज्यातुन आलेल्या स्थलांतरित मजुरांचे अनेक प्रश्न किंवा समस्या दिसुन आल्या. शब्दांत व्यक्त करता येणार नाही असे अनेक कष्ट त्यांच्या वाटयाला आले. "मरायचेच असेल तर आम्ही आपल्या घरी जावुन मरु" या मजुरांच्या मनोवृत्तीमुळे मजुरांचे स्थलांतर मोठया प्रमाणावर झाले आणि अजुनही होतच आहे.

**लाॅकडाऊन मध्ये निर्माण झालेल्या स्थलांतरित मजुरांचे प्रश्नः-**

कोरोना विषाणुच्या संकटाला तोंड देण्यासाठी आपल्या स्वगृही परतण्यासाठी मजुर हजारो किलोमीटर चालत गेला. काही सायकलने तर काहींनी बस, रेल्वेच्या प्रचंड गर्दीतुन प्रवास केला. फार मोठया संख्येने मजुर स्थलांतरीत झाले. अनेकांना आपला जिवही गमवावा लागला. या संदर्भात नियोजनाच किंवा सरकारच्या योग्य अंमलबजावणीचा अभाव होता. असा सवाल बी. बी. सी. ने केला होता. त्याचबरोबर 24 मे पर्यंत घरी परतत असताना 224 मजुरांचा विविध कारणांमुळे मृत्यु झाल्याचे बी. बी. सी. ने तपासले आहे. स्थलांतरीत मजुरांविषयी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिल, "या अभुतपूर्व

संकटात कुणाचीही गैरसोय झाली नाही असा दावा करता येणार नाही. आपले स्थलांतरीत मजुर छोटया उद्योगांमधले कामगार, फेरीवाले यांना प्रचंड मोठया त्रासातुन जाव लागतंय ” . 28 मे 2020 रोजी सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये माहिती देताना सांगितले की 1 कोटीहुन अधिक मजुर एका ठिकाणाहुन दुसÚया ठिकाणी स्थलांतरीत झाले आहेत. जो पर्यंत सर्व मजुर आपल्या घरी पोहचत नाही तोपर्यंत स्थलांतरितांच्या प्रवासाला अंत नाही. या सर्व प्रक्रियेत नोंदणी, वाहतुक व्यवस्था, खादय पदार्थांच्या सोयीमध्ये अनेक त्रुटी राहिल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले आहे. लाॅकडाऊन जाहीर केल्यानंतर पुढचे अनेक दिवस मजुर मोठया संख्येने एकत्र जमल्याचे दिसुन आले. काही बाबतीत पोलीसांना गर्दी नियंत्रणात आणावी लागली तर काही बाबतीत सरकारी आदेशही याला कारणीभुत ठरला.

21 हजार 64 रिलीफ कॅम्पस्मध्ये 6 लाख स्थलांतरीतांची राहण्याची सोय, तसेच 23 लाख स्थलांतरीतांना राज्याराज्यामध्ये अन्नधान्य पुरवण्यात आल्याचे 31 मार्चला क्रेंद्राकडून जाहीर करण्यात आले. स्थलांतरीतांच्या प्रवासामुळे उडालेला गोंधळ आता नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे घडलेच नाही. कारण ही मदत सर्व मजुरापर्यंत पोहचली असती तर हे मजुर आहे तिथेच थांबले असते. कारण बी. बी. सी. ने अशा कित्येक मजुरांची भेट घेतली आहे, जे सरकारने राहण्याची सोय करुनही आपल्या स्वराज्यात परतत होते. त्यांच्यापैकी जवळपास सगळयांनी सांगितले की, कॅम्पस्मध्ये काही ठिकाणी पुरेसे अन्न धान्य नाही, तर काही ठिकाणी अजिबात सुविधा नाहीत. शिवाय एका वेळेच्या जेवणासाठी भर उन्हात तासन-तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र होते. तसेच पहिल्या लाॅकडाऊन मध्ये मोदी सरकार कडून जाहीर करण्यात आलेली आर्थिक मदत मिळाली नसल्याचा दावा अनेक स्थलांतरितानी बोलताना केला. अनेक राजकीय पक्ष मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढे येत असले तरी त्यांच्यासाठी ही एक वोटबँक शिवाय काहीही नाही असे मला वाटते. अधिकत्तर कार्यस्थळी हे मजुर अस्थायी स्वरुपात काम करित असल्यामुळे 'कामगार कायदा ' अंतर्गत मिळणारे अधिकार सुद्धा त्यांना मिळत नाही.

स्थलांतरित मजुरांच्या हित रक्षणासाठी 1979 मध्ये 'आंतरराजीय स्थलांतरित मजुर कायदा ' तयार झाला होता, परंतु हा कायदा आता फारसा उपयोगी ठरला नाही. किंवा त्यांच्या तरतुदी क्वचितच लागु करण्यात आल्या आहेत. लाॅकडाऊन लागु झाल्यानंतर स्थलांतरितांचे जथ्थेच्या जथ्थे गावागावातल्या वेशीवर टांगत चालु लागले, तेव्हा या त्यांच्या लढाईत आपण त्यांना काय दिल असा प्रश्न निर्माण करणारे हे मजुराचे स्थलांतर होत. मात्र कोणत्याही सरकारकडे या प्रश्नाचे आज स्पष्ट उत्तर नाही. कोरोनाच्या साथीने जगभर संकट आले असताना भारत त्यांच्यातुन वेगळ राहण शक्य नव्हंत. भारतातील अस्थायी मजुर, गोरगरीब यांना या अस्मानी संकटाचा सुलतानी फटकाही बसला. विशेषतः स्थलांतर करु इच्छिणाÚया मजुरांना, गरिबांना यांचा फार मोठा फटका बसला. मात्र विकास हा फक्त ळक्च् तच मोजला जात असताना आपल्याकडे विकासातला श्रमजीवींचा सहभाग दखलपात्र सुद्धा असत नाही, हा खरा मुद्दा आहे. असे अनेक प्रश्न या स्थलांतरित मजुरांचे आहे.

स्थलांतरित मजुरांचा स्थलांतराचा वेग आणि स्थलांतराचे अंतर अनाकलनीय होते. दिल्लीतुन बिहारात, आंध्र प्रदेशातुन राजस्थानात, महाराष्ट्रातुन गुजरात किंवा मध्ये प्रदेशात असे अक्षरशः हजारो स्थलांतरित हजारो किलोमीटरचं अंतर संपुर्ण कुटुंबाचं ओझ वाहत असहाय्यपणे चालत होते. संसाराचे तोडके मोडके सामान आणि मुलांना खांद्यावर घेवून हे मजुर जथ्था

जथ्थान जात होते. यात सगळयात भिषन काय असेल तर ती होती सरकारी यंत्रणांची अनावस्था. स्थलांतर करणारे जणू काही कोणी लपूण पळूण जाणारे गुन्हेगार आहेत, असा अविभावात सरकारी यंत्रणा या लोकांना वागवत होत्या. माणसे लपुन छपून कोणत्याही वाहनानं घर गाठत असताना पोलीस त्यांना गुन्हेगारांप्रमाणे पकडत होते. त्यांना काठीने मारत होते. असा हा फटका लाखो स्थलांतरितांना बसला. स्थलांतरितांमध्ये हा वर्ग मोठा होता. कोरोनाच्या निमित्यांन आणि या स्थलांतराच्या अनुषंगान आपल्या समोर काही प्रश्न विचारार्थ उभे टाकले आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार केला असता देशांत सर्वाधिक स्थलांतरित मजुर महाराष्ट्रात अडकलेले होते. राज्यात जवळपास 6 लाख 66 हजार स्थलांतरित मजुर सरकारी निवारा केंद्रात होते बहुतेक मजुर परराज्यात जाताना अडवलेही गेले होते. त्यांची सीमावर्ती जिल्हातील शाळा व सरकारी इमारतीत राहण्याची सोय करण्यात आली होती. अशी राज्य सोडून जाणाÚया स्थलांतरित मजुरांची संख्या आज जवळपास 12 लाखा वर आहे. असे कित्येक जिवघेणे प्रश्न/समस्या लाॅकडाऊन च्या काळात स्थलांतरित मजुरांच्या वाटयाला आले होते.

**लाॅकडाऊन काळात स्थलांतरित मजुरांमुळे सुक्ष्म, लघुमध्यम उद्योगावर पडलेला प्रभाव:-**

“पृथ्वी ही शेषनागाच्या डोक्यावर नाही तर श्रमीकांच्या हातांवर तरली गेली आहे. यांची आज झालेली जाणिव म्हणजेच लाॅकडाऊन काळात स्थलांतरित मजुरांमुळे सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगावर पडलेला प्रभाव होय” .

कोरोना व्हायरसच्या संकटाने जगभरात संकट ओढवून घेतले आहे. कारण अनेक देश या विषाणुचा प्रसार रोखण्यासाठी लक्ष केंद्रीत करीत आहेत. जगभरातील सरकारने लाॅकडाऊन लादले आहेत आणि भारतातही आज गेल्या 3 महिण्या पासून लाॅकडाऊन सुरु आहे. त्यातून उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार केला असता किंवा भारतीय उद्योग क्षेत्राशी त्यांचा संबंध जोडून विचार केला असता सर्व देशभरातील सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगावर (MSME) त्यांचा सर्वांत वाईट परिणाम झाल्याचे दिसून येते.

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र (MSME) गेल्या 5 दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेचे एक अतिशय डौलदार व गतिशिल क्षेत्र म्हणून उदयास आले आहे. मोठया उद्योगाच्या तुलनेत कमी भांडवलावर मोठया संख्येने रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात MSME क्षेत्र महत्वाची भुमिका निभवतातच परंतु ग्रामीण आणि मागास भागांच्या औद्योगिकीकरणास मदत करतात. यामुळे प्रादेशिक असंतुलन कमी होते. राष्ट्रीय उत्पन्न आणि मालमत्तेच्या अधिक न्याय वितरणाची हमी देते. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम मोठया उद्योगांना पुरक उद्योग म्हणुन पुरक आहेत आणि या क्षेत्रामुळे देशाच्या सामाजिक, आर्थिक विकासात मोठा वाटा आहे.

कोरोना हा विषाणु जागतिक अर्थव्यवस्थेलाही अतिशय गंभीर धोका देत आहे, जो आधीच गंभीर संकटात सापडला आहे. भारतीय अर्थव्यवस्था गेल्या 6 वर्षांतील सर्वात कमी दराने वाढत आहे, यात शंका नाही. आणि आता या विषाणमुळे मुक्त झालेल्या आर्थिक आव्हानांचा एक नविन समुह बरीच क्षेत्र गोंधळात टाकत आहे.

हे सर्वज्ञात सत्य आहे की जागतिक पुरवठा साखळीत चीन आणि भारत आणि त्यांच्या MSME क्षेत्रासाठी चीन खुप महत्वाची भुमिका बजावते, हे क्षेत्र आपल्या कच्चा मालासाठी मुख्यत्वे चीनवर अवलंबून असते.

उदा. भारतीय औषध उत्पादक त्याच्यातील सुमारे 70 टक्के साहित्य चिनी कारखाण्यामधुन आणि 30 अब्ज डॉलर्सच्या चीनी वस्तुचा स्त्रोत आहेत. त्यामुळे चीन चे संपूर्ण लॉकडाऊन आणि भारतातील लॉकडाऊन यामुळे निर्यातीत होणारी घट, उत्पादन कमी करणे, स्थलांतरित मजुरांमुळे मनुष्यबळाची अनुपस्थिती, वापराची अनिश्चितता यासारख्या विविध समस्या MSME समोर आज निर्माण झाल्या आहेत. यातील व्यथित क्षेत्रामुळे बऱ्याच लोकांना बेरोजगार व्हाव लागल आणि हजारो औद्योगिक आऊटलेट कायमचे बंद होण्याची संभावना वाढली. अशा स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला आणि अर्थव्यवस्थेला झेप देणारा आणि मर्यादा घालुन देणारा MSME हा सर्वात महत्वाच्या क्षेत्रावर विपरीत परिणाम होत आहे.

देशांच्या वाढीचे इंजिन म्हणून म्हणून ओळखले जाणारे MSME क्षेत्राचे उत्पादन भारतातील उत्पादनाच्या क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावतात. जे सुमारे 120 दशलक्ष रोजगारनिर्मिती करतात. आणि भारताच्या निर्यातीत 45 टक्के उत्पादन करतात. परंतु लॉकडाऊन व वाढत्या स्थलांतरित मजुरांमुळे या क्षेत्रातील समस्या वाढल्या आहे. आज भारतातील सुक्ष्म, लघु व मध्यम क्षेत्रात रोजगार करणारे लाखो मजुर उद्योग सोडून जिवाचा आकांताने आपल्या स्वगृही परतल्यामुळे या क्षेत्राचे सर्वाधिक मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे आणि या मोठया प्रमाणावर स्थलांतरित झालेल्या मजुरांच्या अनउपलब्धतेमुळे हे उद्योग पुर्ववत सुरु होणे अवघड झाले आहे. अंतिम ग्राहकांच्या वापरांच्या मागणीची पुर्तता करण्यात आणि मोठया व्यवसायासाठी मध्यंतरी वस्तुंचा पुरवठा करण्यात अत्यंत महत्वाची भुमिका बजावतात. देशांत अंदाजे 8 कोटी छोटे व्यवसाय असुन हे छोटे व्यवसाय किंवा सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगात जवळपास 15 कोटी कामगार कामावर होते. परंतु 23 मार्च रोजी देशात लादलेल्या आर्थिक लॉकडाऊन मुळे सुमारे 70 टक्के अर्थव्यवस्था पाच आठवडयापेक्षा जास्त काळ थांबली. 4 मे 2020 रोजी लॉकडाऊन अर्धवट शिथिल झाल्यानंतर 50 टक्के अर्थव्यवस्था अजुनही बंद आहेत या मध्ये MSME आणि त्यांच्याद्वारे नियुक्त केलेल्या कामगारांचे सर्वाधिक नुकसान झाले. 10 कोटीहुन अधिक कामगारांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या. यात विशेष म्हणजे स्थलांतरित मजुरांचाही समावेश आहे.

स्थलांतरित मजुरांमुळे MSME क्षेत्राला मोठया प्रमाणावर फटका बसल्याने अर्थव्यवस्था दररोज कोटयावधी रुपयाचे नुकसान सहन करित आहे. लॉकडाऊनपासुन आतापर्यंतच्या MSME क्षेत्राच्या महसुलात सुमारे 12 लाख कोटीपेक्षा जास्त तोटा झालेला आहे. हा तोटा भरुन काढणे सध्यास्थितीत तरी शक्य नसले तरी स्थलांतरित मजुरांच्या पुर्नवापसी मुळे काही प्रमाणात स्थिती सुधारण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार कडून 20 लाख कोटी चे पॅकेज MSME क्षेत्रासाठी जाहीर केले असेल तरी ते या क्षेत्रातील नुकसान पुर्णता भरुन काढु शकणार नाही. 2018-19 मध्ये भारताचे MSME क्षेत्राचे वार्षिक बजेट 6,552.61 कोटी रुपये होते. परंतु 2020-21 मध्ये उद्भवलेल्या या संकटामुळे हा MSME चा वार्षिक अहवाल जवळपास 50 टक्के ने घटण्याची शक्यता आहे.

**1. उद्योग बंद/उद्योग पडण्याच्या मार्गावर:-**

भारतात जवळ-जवळ कोटीच्या संस्थेत MSME क्षेत्राची संख्या आहे. यात कोटीच्या संख्येने मजुर कामासाठी होते. परंतु या उद्भवलेल्या कोरोना महामारी मुळे कोटयावधी मजुर स्वगृही स्थलांतरित झाल्यामुळे अनेक उद्योग पडण्याच्या मार्गावर आहे. किंबहुना कित्येक उद्योग बंद पडले आहे.

**2. पुरवठा साखळी खंडीत:-**

**स्थलांतरित मजुरांमुळे लाखोच्या संख्येत** MSME **उद्योग बंद पडल्याने विविध वस्तुच्या उत्पादनाची प्रक्रिया खंडित झाल्याने वस्तुचा पुरवठयाची साखळी पुर्णता खंडीत झाली आहे.**

**3. भाववाढीची समस्या:-**

**स्थलांतरित मजुरांमुळे पुरवठा साखळी खंडित झाल्याने त्याचा मागणीवर विपरीत परिणाम होवुन अनेक वस्तु व सेवाचा भाववाढी सारखी समस्या गंभीर स्वरुपात निर्माण झाली आहे.**

**4. आर्थिक नुकसान:-**

**लाखोच्या संख्येत** MSME **क्षेत्रातील मजुर स्थलांतरित झाल्यामुळे डैडम् क्षेत्रावर त्याचा मोठा प्रभाव पडल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेला फार मोठया संकटांना समोरे जावे लागणार आहे.**

**5. कर्ज परतफेडीची समस्या/अडचण:-**

MSME **क्षेत्रातील स्थलांतरित मजुरामुळे उत्पादन प्रक्रिया खंडित झाल्याने** MSME **उद्योग आर्थिक संकटांत सापडल्याने या उद्योगासमोर कर्ज परतफेडीची फार मोठी समस्या/अडचण उभी राहिली आहे.**

**6. मोठया उद्योगाला फटका:-**

**स्थलांतरित मजुराच्या समस्येमुळे** MSME **क्षेत्र मोठया प्रमाणावर बंद पडल्याने कच्च्या मालाचा उत्पादनावर विपरित परिणाम झाल्याने पर्यायाने त्यांचा फार मोठया प्रमाणावर फटका मोठया उद्योगाला बसला आहे.**

**7. विकास दरात घट:-**

**भारताचा आर्थिक विकास** MSME **क्षेत्राचा फार मोठया प्रमाणावर सहभाग आहे. परंतु सदयास्थितीत या क्षेत्रात उद्भवलेल्या संकटामुळे भारताचा आर्थिक विकास दर मागील** 6 **वर्षाच्या तुलनेत या वर्षात मोठया प्रमाणावर घटण्याची शक्यता आहे.**

**8. राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम:-**

**स्थलांतरित मजुरांमुळे** MSME **क्षेत्रावर उद्भवलेल्या संकटामुळे विकास दर घटल्याने पर्यायाने त्यांचा विपरीत परिणाम राष्ट्रीय उत्पन्नावर होवुन राष्ट्रीय उत्पन्नात घट होण्याची संभवना आहे.**

**9. इतर परिणाम:-**

**लाॅकडाऊन काळात स्थलांतरित मजुरांमुळे सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगावर फार मोठया प्रमाणावर विपरीत परिणाम पडला असुन पर्यायाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक असा इतरही अनेक समस्या उद्भवलेल्या आहे.**

**असा या लाॅकडाऊन मुळे निर्माण झालेल्या स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि** MSME **उद्योगावर झालेला या परिणामाला वेळेत प्रभावित करण्यासाठी सरकारकडूनच नाही तर भारतातील प्रत्येक नागरिकांकडून प्रयत्न केले जाने आवश्यक आहे तरच ही अर्थव्यवस्था भविष्यात लवकरात लवकर पुर्ववत येण्याची शक्यता आहे.**

**संदर्भ सुची:-**

1. **'स्थलांतरितानी उभे केलेले प्रश्न ' डाॅ. विश्वंभर चैधरी** - 12 **एप्रिल** 2020

2. **'कोवीड**-19 **आणि लाॅकडाऊन: डैडम् आणि सरकारच्या अपेक्षांवर परिणाम' सुखेश मदान (मुख्य कार्यकारी अधिकारी, ब्लाउपंक्ट आॅडिओ इंडिया)** - 22 **एप्रिल** 2020

3. **'कोरोना लाॅकडाऊनने भारतातल्या स्थलांतरित गरीबांचे कसे केले हाल? गिता पांडे (बी. बी. सी. प्रतिनिधी)** - 24 **एप्रिल** 2020

4. 'कोरोना लॉकडाऊन - स्थलांतराचे प्रश्न 'जुगल पुरोहीत (बी. बी. सी. प्रतिनिधी) - 1 जुन 2020

5. 'सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगावर ( डैडम् ) कोविड-19 साथीचा परिणाम 'भारत अहवाल (अभिषेक आनंद, मनोज नायम, नितिश नारायन, शोश्रित मिश्रा, सुरभी सुद, आकाश मेहरोत्रा, मोहक श्रीवास्तव आणि गायत्री) - 4 जुन 2020

6. 'मजुर कायदा ' बी. एन. बसू, एशियन लॉ हाऊस - 2002-03